# पवना सहकारी बँक लि.पुणे.

मुख्य कार्यालय : - प्लॉट नं.८३, डी-II ब्लॉक, एम.आय.डी.सी., टेल्को रोड, चिंचवड, पुणे - ४११ ०१९.
फोन नं.: ०२०-६६११५२०५/६, २७४७१४७७, Email : pavanabank@gmail.com / www.pavanabank.com

# ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना

(फक्त सभासदांकरीता)

पवना सहकारी बँक लि., पुणे या बँकेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१८/०९/२०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता, स्थळ:- मोरया मंगल कार्यालय, आदित्य बिर्ला हॉस्पिटल शेजारी, दत्त नगर, थेरगाव, पुणे - ३३. येथे खालील विषयांच्या कामकाजासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी सदर सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. २० सप्टेंबर २०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा.संचालक मंडळाने तयार केलेला ४३ वा वार्षिक अहवाल व दि.३१ मार्च २०१६ चा ताळेबंद व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३) मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०१५-१६ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
४) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकाची माहिती घेणे.
५) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल स्विकृत करणे.
६) मा.संचालक मंडळाने सन २०१६-१७ साठी नेमलेल्या समावर्ती लेखापरीक्षकांची व त्यांचे मानधनाची माहिती घेवून त्यास मान्यता देणे.
७) सन २०१६-१७ साठी वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणुक करणे.
८) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचे कडून येणे असलेल्या कर्जाची (सहकारी कायदा कलम ७५(२) नुसार) माहिती घेणे.
९) बँकेचे सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण याकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे.
१०) लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
११) मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन
**मनेश बबन बोऱ्हाडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : चिंचवड,पुणे
दिनांक : ०३/०९/२०१६.

---

**विशेष सुचना :**

१) गणसंख्येअभावी सदरची सभा तहकूब झाल्यास हिच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी ठिक ११.00 वाजता सुरु होवून वरील विषयांचे कामकाज करण्यात येईल. त्या सभेस गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीसीमध्ये नमूद केलेल्या विषयाचा विचार केला जाईल.
२) सन २०१५ - १६ या आर्थिक वर्षाची लेखा परिक्षण झालेली हिशोब पत्रके ज्यामध्ये ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तसेच मा. संचालक मंडळाच्या अहवालाच्या प्रती ज्या सभासदांना हव्या असतील त्यांनी बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये कामकाजाच्या वेळात संपर्क साधल्यास उपलब्ध करुन दिल्या जातील.
३) वरील नोटीशीमध्ये निर्देशित केलेल्या विषयासंबंधी काही सूचना असल्यास त्या लिखीत स्वरुपात दि. ०९/०९/२०१६ पर्यंत मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहोच कराव्यात.
४) सन २०१२-१३ या वर्षाचा लाभांश ज्या सभासदांनी अद्याप नेला नसेल तर घेऊन जाण्याची व्यवस्था करावी अन्यथा सदर लाभांश रक्कम बँकेच्या पोटनियम क्र.५८ (४) अन्वये बँकेच्या गंगाजळीत वर्ग करण्यात येणार आहे याची सभासदांनी नोंद घ्यावी.